**2019 IV 04** **0930** **Seat No.** | | | | | |

**Time : 1½ Hours** **SOCIAL SCIENCE-I (M)**

(History and Civics)

**Subject Code**

| S | 0 | 1 | 2 | A |
|---|---|---|---|---|

**Total No. of Questions : 4** **(Printed Pages : 6)** **Maximum Marks : 40**

**सूचना : —** (*i*) प्रत्येक प्रश्न नवीन पानावर लिहा.

(*ii*) प्रश्नांचा क्रमांक व उपक्रमांक स्पष्टपणे लिहा.

(*iii*) **सर्व** प्रश्न अनिवार्य आहेत.

(*iv*) उजवीकडील अंक प्रश्नाचे पूर्ण गुण दर्शवितात.

1. (अ) खालील प्रत्येक विधानासमोर तीन पर्याय (अ, ब, क) दिले आहेत. त्यातील अचूक पर्याय निवडून त्याचे सूचकाक्षर विधानाच्या क्रमांकासमोर लिहा : 2

(*i*) होकायंत्र ............................ शतकापासून उपयोगात आणले गेले.

(अ) 15 व्या

(ब) 16 व्या

(क) 17 व्या

(*ii*) मध्ययुगात ............................ व्यापार व्यवहाराचा प्रमुख मार्ग होता.

(अ) हिंद महासागर

(ब) अटलांटीक महासागर

(क) भूमध्य भाग

(*iii*) भारतात पहिली रेल्वे लाईन ............................ यांच्या कारकिर्दीत पूर्ण करण्यात आली.

(अ) लॉर्ड कर्झन

(ब) लॉर्ड डलहौसी

(क) लॉर्ड इर्विन

(*iv*) जेथ्रो टूल या शास्त्रज्ञाने ............................ या यंत्राचा शोध लावला.

(अ) टेलिफोन

(ब) संरक्षक दीप

(क) पेरणी यंत्र

(ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 2

(1) भौगोलिक शोध उपक्रमात कोणत्या युरोपियन देशाने सर्वप्रथम पुढाकार घेतला ?

(2) आपल्या पुस्तकात बदलत्या समाजातील स्त्री जीवनाचे विवरण करणाऱ्या एका महिला लेखिकेचे नाव लिहा.

(क) खालील कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर **दोन** वाक्यात लिहा : 2

(1) इंग्लंडच्या वाढत्या कारखान्यांना कामगार मोठ्या प्रमाणात कसे उपलब्ध झाले ?

(2) औद्योगिकरणाचा इंग्लंडवर कोणता परिणाम झाला ?

(ड) खालील कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर **चार** वाक्यात लिहा : 4

(1) सप्त वार्षिक युद्धाबद्दल अमेरिकेतील वसाहतीत कसे एकमत नव्हते ?

(2) इतिहासात अमेरिकेचे स्वतंत्रयुद्ध ही महत्वाची घटना का मानली आहे ?

2. (अ) खालील 'अ' गटात काही विधाने व 'ब' गटात काही व्यक्तींची नावे दिली आहेत. त्यांची अचूक जुळणी करा व त्याचे सुचकाक्षर क्रमांकासमोर लिहा : 2

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (1) नेपोलियन | (अ) फ्रान्सचा राजा |
| (2) मारिया अंटोनेट | (ब) पिडमोंटचा पंतप्रधान |
| (3) मेझिनी | (क) लष्करी दलाचा सरसेनापती |
| (4) काऊट काव्हूर | (ड) इटली देश, इटालियन लोकांचा |
| | (इ) सोळाव्या लुईची पत्नी |

(ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 2

(1) फ्रान्सातील विशेषाधिकार असलेले वर्ग कोणते ?

(2) व्हिक्टर इमेन्युअल दुसरा यांनी 1861 मध्ये कोणते पद धारण केले ?

(क) खालील दिलेल्या प्रत्येक विधानाची **दोन** कारणे लिहा : 6

(1) फ्रेडरिक विल्यम चौथा यांनी विधिमंडळाचा प्रस्ताव फेटाळून लावला.

(2) भारतीयांनी सायमन आयोगाचे स्वागत "सायमन परत जा" या घोषणेने केले.

(3) काँग्रेसने क्रिप्स प्रस्ताव फेटाळून लावला.

3. (अ) ‘ब’ रकान्यातील शब्दांचा ‘अ’ रकान्यातील शब्दांशी संबंध आहे. ‘ड’ रकान्यात ‘क’ रकान्यातील शब्दांशी तसाच संबंध दर्शविणारे शब्द क्रमांकासमोर लिहा : 2

| **क्र.** | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| (1) | टिळक | केसरी | अरविंद घोष | — |
| (2) | असहकार चळवळ | 1920 | भारत छोडो आंदोलन | — |
| (3) | पी.पी. शिरोडकर | अंगोला | दिवाकर काकोडकर | — |
| (4) | मुंबई | गोमंतक प्रजा मंडळ | पुणे | — |

(ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 4

(1) गोव्यात पोर्तुगीजांच्या विरोधात सुरु केलेल्या लष्करी कारवाईला काय म्हणत ?

(2) माननीय राष्ट्रपती लोकसभेवर किती सदस्यांची नियुक्ती करू शकतात ?

(3) राज्यसभेच्या सदस्यांची निवड कोण करतो ?

(4) संसदेचे वरिष्ठ सभागृह कोणते ?

(क) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **दोन** वाक्यात लिहा : 4

(1) डॉ. सालाझारच्या राजवटीत गोव्याच्या लोकांवर कशा प्रकारे अन्याय करण्यात आला ?

(2) राष्ट्रपतीचे लष्करी अधिकार कोणते ते लिहा.

4. (अ) खालील प्रत्येक प्रश्नाखाली तीन पर्याय (अ, ब, क) दिले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून त्याचे सूचकाक्षर विधानाच्या क्रमांकासमोर लिहा : 2

(*i*) राज्याच्या संविधानात्मक प्रमुख कोण असतो ?

(अ) राज्यपाल

(ब) मुख्यमंत्री

(क) सभापती

(*ii*) गोवा राज्याचे विधानसभा संकुल कोठे आहे ?

(अ) मडगाव

(ब) पर्वरी

(क) पणजी

(*iii*) ग्रामसभेचे अध्यक्षपद कोण भूषवितो ?

(अ) सचिव

(ब) सरपंच

(क) गट विकास अधिकारी

(*iv*) गोव्यात किती जिल्हा पंचायती आहेत ?

(अ) 11

(ब) 6

(क) 2

(ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 2

(1) 1961 साली गोव्यात झालेल्या लष्करी कारवाईचा प्रमुख कोण होता ?

(2) ग्रामसभा म्हणजे काय ?

(क) खालील कोणत्याही **एका** विधानाची **दोन** कारणे लिहा : 2

(1) सर्वोच्च न्यायालयाला आपल्या मूळ निर्णयावर फेरविचार करण्याचा अधिकार असतो.

(2) उच्च न्यायालय हे मुलभूत अधिकारांचे संरक्षक असते.

(ड) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **दोन** वाक्यात लिहा : 4

(1) राज्यपालांचे माफी देण्याचे अधिकार कोणते ते लिहा.

(2) नगरपालिकांची प्राप्त स्वरुपाची कर्तव्ये कोणती ते लिहा.